CMYK

आषाढी कार्तिकी विसरू नका मज! सांगत असे गुज पांडुरंगा !! >>पान 2

अंधेरीतील कांदळवन तोडीविषयी गंभीर चिंता >>पान 3

मेहकर तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर >>पान 4

**सुविचार**

जीवनातील प्रत्येक क्षणाचा आदर करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 297 ■ बुधवार, दि. 09 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मुंबईतील मेहबूब स्टुडिओमध्ये श्रीलीला करतेय शूट, पण कोणत्या चित्रपटासाठी हे मात्र गुलदस्त्यात! आतील पान

## सार्वजनिक विद्यापीठे, अशासकीय महाविद्यालयांमधील रिक्त पदांच्या भरतीस वेग येणार

# अभियांत्रिकी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदे भरल्यास नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदभरती रिक्त पदांच्या भरतीस सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आला. तसेच अभियांत्रिकी शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दाखवण्यात आली. अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.**

विधानभवन येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विद्यापीठांच्या प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव श्री. सौरभ, नियोजनचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण संचालक



शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदींसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या कमी असून, ही विद्यापीठे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील व गुणवत्ता वाढेल. लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात १०५ अध्यापकीय पदे, एक शिक्षक समकक्ष पदांस मंजुरी देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. याचबरोबर इतर विद्यापीठाप्रमाणे तंत्रज्ञान विद्यापीठात आठ कोटी रूपये दैनंदिन व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी प्रदान करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच ७८८ अध्यापकीय पदे, २,२४२ इतकी शिक्षकेतर पदे भरण्यात मान्यता देण्यात आली आहे. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ५,०१२ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच व्ही.जे.टी.आय व श्री. गुरूगोविंदसिंग अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड यांसह राज्यातील इतर शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठास एकूण ६०३ पदांचा सुधारित आकृतीबंधही मंजूर करण्यात आला.

### वडगाव शेरी मतदारसंघात पुरापासून संरक्षणाच्या कामांसाठी २५० कोटीचा निधी मंजूर- उद्योगमंत्री उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी :** वडगाव शेरी मतदारसंघात पुरापासून संरक्षणाच्या कामांसाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यापैकी ७० कोटी रुपये प्राप्त झाली आहेत. यातून या भागात पुरापासून संरक्षण विषयक पायाभूत सुविधांची कामे करण्यात येणार आहेत, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. सदस्य बापूसाहेब पठारे यांनी या संदर्भात मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री श्री. सामंत यांनी माहिती दिली.

मुळा नदीच्या पुरामुळे येरवडा, विश्रांतवाडी, कळस भागात दरवर्षी गंभीर पूरस्थिती निर्माण होते, यावर कायमस्वरुपी प्रतिबंधात्मक योजना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण () अंतर्गत प्रकल्पांतर्गत सीसीटीव्ही व पब्लिक अॅड्रेस सिस्टीम यंत्रणा अतर्भूत असलेले खांब नदीलगतच्या भागात बसविण्याचे नियोजन असून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले, यंदा खडकवासला धरणातून १६ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग असतानाही या भागात पूर परिस्थिती निर्माण झाली नाही. या भागातील नागरिकांच्या पुनर्वसनासंबंधी देखील सकारात्मक निर्णय घेऊन नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, असेही उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

### सहकारी उपसा जलसिंचन योजनांची थकबाकी बँकांनी वसुली करू नये - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २६१ सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्या कर्जाच्या थकबाकी संदर्भात निर्णय होईपर्यंत संबधित संस्था, शेतकरी यांच्यावर संबंधित बँकांनी जप्ती किंवा अन्य कोणतीही कारवाई करू नये. यासंदर्भात संबंधित बँकांना शासनामार्फत सूचना दिल्या जातील, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.




राज्यातील २६१ सहकारी उपसा सिंचन योजनांची थकबाकी कर्जमाफी संदर्भात सदस्य डॉ. विनय कोरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधीच्या उत्तरात सदस्य नाना पटोले यांनी सहभाग घेतला.

राज्यातील २६१ सिंचन योजनांची थकबाकी कर्जमाफी संदर्भात १४ ऑक्टोबर २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत, केवळ १३२.२४ कोटी रुपये माफ करण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये व्याजाच्या रकमेचा समावेश नव्हता. भारतीय रिझर्व बँकेने कर्जमुक्ती संदर्भात केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा विचार करता व्याजाच्या रक्कमेसह सर्व रक्कमेस मंत्रिमंडळाची पुन्हा मान्यता घेणे आवश्यक असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडणुकीवरुन विरोधक आक्रमक

## विधानसभा अध्यक्षांचं एका वाक्यात उत्तर

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमधील महायुती सरकारचं दुसरं विधिमंडळ अधिवेशन होत असून अद्यापही राज्यात विरोधी पक्षनेतेपदावर कोणाचीही वर्णी लागली नाही. विधानसभा विरोधी पक्षनेतेपदी महाविकास आघाडीमधील नेत्याची नियुक्ती करावी, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. मात्र, अद्यापही त्याबाबतच निर्णय झालेला नाही. त्यामुळे, आज पुन्हा एकदा विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीवरुन सभागृहात गोंधळ झाल्याचं दिसून आलं. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल शिवसेना उबाठा पक्षाच्या आमदारांना दिलेल्या सूचनेनुसार आज पुन्हा एकदा विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा समोर आणण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार, महाविकास आघाडीचे आमदार आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं, त्यांनी सभागृहाबाहेर घोषणाबाजीही केली.**



विधानभवनात आज सकाळी विरोधी पक्षनेते पदाबाबत महाविकास आघाडीतील आमदारांची बैठक पार पडली. त्यामध्ये भास्कर जाधव, अजय चौधरी, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड विजय वडेट्टीवार, सतेज पाटील हे आमदार उपस्थित होते. या बैठकीनंतर विरोधी पक्षनेते पदाचा मुद्दा सभागृहात मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय कधी घेणार? हा प्रश्न विधानसभा अध्यक्षांना सभागृहात विचारण्यात आला. त्यावर, आपल्या दालनात यावर चर्चा झाल्याचे विधानसभा अध्यक्षांनी सांगितलं. तसेच, ठरल्याप्रमाणे विरोधी पक्षनेते पदाबाबत विधानसभा अध्यक्षांचे उत्तर महाविकास आघाडीतील आमदारांना रेकॉर्डवर मिळालं. याच मुद्द्यावरुन विरोधी पक्षाचे आमदार आक्रमक झाले होते. तसेच, लवकरात लवकर विरोधी पक्षनेतेपदाची निवड करण्यात यावी, अशी मागणीही आमदारांनी केली.



### अकोला जिल्ह्यात गौण खनिजाची अवैध वाहतूक झाल्याची माहिती प्राप्त झाल्यास पुन्हा चौकशी- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील अकोला-काकड रस्ता उभारणी करताना ५६ ब्रास मुरुमाची टिप्परद्वारे विना रॉयल्टीने वाहतूक होत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. एका व्हिडिओवरुन प्राप्त माहितीच्या आधारे संबंधितांना दंड करण्यात आला. यासंदर्भात त्यांनी एक कोटी ६८ लाख रॉयल्टी भरली असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य अमोल मिटकरी यांनी



यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, हे काम सुरू करताना तेथील एका शेतकऱ्याने शेतात पाणी जात असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे अशी विनंती केल्यावरुन कंपनीने तेथील मलबा उचलून इतरत्र नेला असून याबाबत अधिकची माहिती उपलब्ध झाल्यास त्याबाबत पुन्हा चौकशी करण्यात येईल, असे महसूल मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले.

### वनालगतच्या जमिनींवर सोलार कुंपणाची योजना विचाराधीन - वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :**वनालगतच्या जमिनीच्या शेतकऱ्यांना प्रति एकर वार्षिक ५० हजार रुपये देऊन शासनाने त्या जमिनी ताब्यात घ्याव्यात आणि सोलार कुंपण घालावे, अशी योजना शासनाच्या विचाराधीन असल्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य सदाशिव खोत यांनी लातूर जिल्ह्यात जंगली प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. वनमंत्री श्री.नाईक म्हणाले, राज्यात वन्यजीवांची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना त्यांचा त्रास होत आहे, ही बाब खरी आहे. वनक्षेत्रालगत सोलार कुंपणासाठी अर्थसंकल्पात २०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### ऑनलाईन गेम्सवर विनियमनासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येणार- राज्यमंत्री पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** ऑनलाईन लॉटरी आणि गेम्स यांचे प्रभावी विनियमन व्हावे यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनास विशेष कायदा करण्याची विनंती करण्यात येणार असल्याचे माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य किशोर जोरगेवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यमंत्री श्री. भोयर म्हणाले, राज्यात ऑनलाईन जुगार आणि गेम्समुळे वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांना रोखण्यासाठी महाराष्ट्र सायबर विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. समाजमाध्यमांद्वारे तसेच प्रत्यक्ष सायबर जनजागृती कार्यक्रम राबवून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली जात आहे.

सन २०१७ ते २०१९ या कालावधीत राज्यातील एकूण ३,२५३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सायबर गुन्ह्यांच्या आधुनिक तपास पद्धतींबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ऑनलाईन गेम्स बंद करण्यासाठी सध्या कोणताही स्वतंत्र कायदा अस्तित्वात नसला तरी केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (इंटरमिजिएट्री गाईडलाईन्स अँड डिजिटल मीडिया येथे कोड) रुल्स २०२१ हे नियम दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या पुनर्रचनेची अधिसूचना जाहीर

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध विकास कामे व प्रकल्पांना किनारी क्षेत्र नियमन (सीआरझेड) अंतर्गत वेळेवर मंजुरी मिळावी यासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण पुनर्रचना व्हावी यासाठी राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण पुनर्रचित करत अधिसूचना जारी केली आहे.

ही अधिसूचना काल (७ जुलै) राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली असून, पुढील तीन वर्षांसाठी हे प्राधिकरण कार्यरत राहणार आहे.

महाराष्ट्रातील विविध शासकीय आणि खासगी प्रकल्पांना सीआरझेड अंतर्गत मान्यता आवश्यक असते. यासाठी १९९८ पासून महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण कार्यरत होते. मात्र, या प्राधिकरणाची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये संपुष्टात आली. त्यामुळे नवीन प्रकल्पाना मंजुरीसाठी अडचणी निर्माण होतं होत्या.

राज्य शासनाने नव्या प्राधिकरणाची स्थापना लवकर व्हावी म्हणून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला होता. यानंतर राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी पुढाकार घेत, सातत्याने केंद्राशी संपर्क ठेवत हा विषय मार्गी लावला.

प्राधिकरणाच्या पुनर्रचनेमुळे राज्यातील प्रकल्प मार्गी लागतील आणि राज्याच्या शाश्वत विकासाला चालना मिळेल. या निर्णयामुळे विकास आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये समतोल राखत कार्य करता येईल. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी राज्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला, यासाठी मी त्यांचे मनापासून आभार मानते, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

प्राधिकरणाची रचना

नव्या प्राधिकरणात प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, वैज्ञानिक, पर्यावरण तज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्था यांचा समावेश करण्यात आला आहे. मुंबई येथून हे प्राधिकरण कामकाज पाहणार आहे.

प्राधिकरणातील प्रमुख सदस्य पुढीलप्रमाणे :

- पर्यावरण व हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव अध्यक्ष (कार्यभारिक)
- महसूल, ग्रामविकास, नगरविकास, मत्स्यव्यवसाय व उद्योग विभागांचे सचिव सदस्य
- मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी सदस्य
- मँग्रोव्ह सेलचे अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक सदस्य
- केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य
- पर्यावरण तज्ज्ञ: डॉ. एल. आर. रंगनाथ, डॉ. मिलिंद सरदेसाई, डॉ. अमित बन्सीवाल, डॉ. अनिश अंधेरिया
- बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष
- स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी
- पर्यावरण विभागातील संचालक स्तरावरील अधिकारी सदस्य सचिव

प्राधिकरणाच्या जबाबदाऱ्या :

* सीआरझेड अधिसूचनेनुसार प्रकल्प प्रस्तावांचे परीक्षण व शिफारस
* सागरी व किनारी परिसंस्थेचे संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन
* किनारी क्षेत्रातील विकास कामांवर नियंत्रण ठेवणे
* अधिनियमाचे उल्लंघन झाल्यास चौकशी आणि कारवाई
* केंद्र सरकारकडे आवश्यक बदलासाठी प्रस्ताव पाठवणे
* पारदर्शकतेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ स्थापन करून कामकाजाची माहिती प्रसिद्ध करणे
* पारंपरिक मच्छीमार व किनारपट्टी समाजाच्या हक्कांचे रक्षण



दर सहा महिन्यांनी अहवाल देणे बंधनकारक

प्राधिकरणाने कामकाजाचा तपशीलवार अहवाल दर सहा महिन्यांनी केंद्र सरकारला सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे केवळ पर्यावरण रक्षण नाही, तर शाश्वत विकासाच्या दिशेनेही राज्य शासनाची वाटचाल अधिक गतीमान होणार आहे. प्राधिकरणाची ही पुनर्रचना म्हणजे पर्यावरण रक्षण आणि विकास यामधील समतोल राखण्याचा प्रयत्न असून, मंत्री पंकजा मुंडे यांच्या सक्रिय पुढाकारामुळे प्राधिकरण गठीत झाले आहे.

CMYK

## कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०० वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख. गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो. ९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते. गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय रहनेको सदा दहरमे आता नही कोई , तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई एक बार तो मौत भी घबरा गई होगी, यू मौत को सिने से लगाता नहीं कोई

# आषाढी कार्तिकी विसरू नका मज! सांगत असे गुज पांडुरंगा !!

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**





**बिबी :** दिनांक ६ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त सिंदखेडराजा तालुक्यातील केशव शिवणी येथे केशवराज संस्थान येथे महापूजा संपन्न. प्रसिद्ध व्यावसायिक वसंतराव उदावंत यांच्या हस्ते महापूजा संपन्न पौराणिक वारसा असलेल्या या मंदिराचा यावर्षी ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून चार दगडी मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला असून या मंदिरातील मूर्ती नेपाळ येथील गंडकी अर्थात कृष्णशिला या पाषाणापासून बनवण्यात आली शंखचक्र पद्म गदा अशी चतुर्भुज श्री विष्णू स्वरूप श्री केशव राजाची पूर्णाकृती मूर्त तयार करण्यात आली .श्री केशव राजाच्या प्रवेशद्वारावर गरुडाची मूर्त विराजमान करण्यात आली. चार दगडी हेमाडपंथी पौराणिक वारसा असलेल्या मंदिराची रचना मनाला मोहून टाकते. कोरीव नक्षीदार अशी रचना असलेल्या या चार दगडी मंदिरामध्ये संत ज्ञानेश्वर माऊली संत मुक्ताबाई, श्रीराम प्रभू ,पार्वती माता ,श्री गणराज गणपती, संत शिरोमणी नरहरी महाराज ,शंकर भोलेनाथाची सुरेख अशा देवतांच्या पूर्णाकृती मूर्ती बसवण्यात आल्या या सर्व मूर्ती मनमोहक आहेत. आषाढी एकादशी निमित्त झालेली महापूजा केशवराज मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा विश्वस्त श्री वसंतराव उदावंत सचिव प्रल्हाद वाघ सदस्य सुभाषराव गावडे सदस्य मधुकर वैद्य ज्ञानेश्वर कुलथे डिगंबर घुगे शहादेव आंधळे खुशालराव शेरे राजू मुंढे कडूबा मांटे सुरज गीते गजानन बरबडे या दांपत्य त्यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली. पंडित शिवहरी देशपांडे यांच्या मंत्रोच्चारात व जयघोषणात मूर्तीला महाभिषेक व महापूजा संपन्न झाली. या महापूजेचे वेळी सरपंच विकास आंधळे माजी सरपंच भगवानराव सानप शेषरावजी घुगे व ग्रामस्थ भजनी मंडळ तथा ग्रामस्थ महिला भाविक भक्त बहुसंख्येने उपस्थित होते दिवसभर चाललेल्या या भक्तिमय वातावरणात लोक तल्लीन होऊन भजनाचा आनंद घेताना दिसत होते .पंचक्रोशीतील भाविक भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेतील शब्दांचा युनेस्कोमधील राजदूतांकडून सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेतील शब्दांचा गौरवपूर्ण उल्लेख हा तमाम शिवप्रेमी आणि महाराष्ट्रासाठी एक आनंददायी आणि अभिमानास्पद क्षण आहे. युनेस्कोमधील ग्रीसचे राजदूत श्री. जॉर्जिओस कौमुत्साकोस यांनी राजमुद्रेतील शब्दांचा ''अतिशय विद्वत्तापूर्ण शब्द'' असा उल्लेख केला आहे. युनेस्कोमधील भारताचे राजदूत विशाल शर्मा यांनी ग्रीसचे राजदूत श्री. कौमुत्साकोस यांना शिवछत्रपतींच्या राजमुद्रेचे स्मृतीचिन्ह भेट दिले. त्यावेळी झालेल्या चर्चेत श्री. कौमुत्साकोस यांनी ही प्रतिक्रिया उत्स्फुर्तपणे व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेतील शब्दांची योजकता अत्यंत समर्पक असल्याचा उल्लेख त्यांनी केला. राजमुद्रेतील ''शहाजींचे पुत्र शिवाजी (महाराज) यांच्या या मुद्रेचा महिमा चंद्राच्या कलांप्रमाणे वाढत राहील. जग त्याचा सन्मान करेल आणि ते केवळ लोकांच्या कल्याणासाठी चमकेल.''

# अपर पोलीस अधीक्षक पीयूष जगताप यांची बदली

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**



**दिग्रस:** लनिग्रणाय पोलिसांचे या ब्रीदवाक्या चे तंतोतंत पालन करणारे जिल्ह्यातील कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा चेहरा म्हणून ओळख निर्माण केलेले अपर पोलीस अधीक्षक श्री. पीयूष जगताप यांची बदली राज्य राखीव पोलीस बल () गट क्र. ४, चंद्रपूर येथे समादेशक (कमान्डंट) या पदावर करण्यात आली आहे. ही बदली केवळ बदल नव्हे, तर त्यांच्या प्रामाणिक कार्याची आणि कठोर प्रशासकीय क्षमतेची दखल मानली जात आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या पाशांना तडा देणारे, तात्काळ निर्णय घेणारे आणि सक्षम पोलिसिंगचे जिवंत उदाहरण ठरलेले अधिकारी म्हणजे पीयूष जगताप. त्यांच्या कार्यकाळात गुन्हेगारीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले, तसेच महिला सुरक्षा, सामाजिक सलोखा, आणि युवकांमध्ये कायदापालनाची जाणीव निर्माण करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले.

विशेष म्हणजे, दिग्रस शहरातील बेकायदेशीर लेआउट प्रकरणाची मार्फत प्रभावी चौकशी त्यांनी पुढाकाराने हाती घेतली. या प्रकरणात त्यांनी पारदर्शकता, कडक निर्णय आणि कोणतीही राजकीय दबाव न मानता कामगिरी केली, हे नागरिक आज अभिमानाने सांगतात.

त्यांच्या कार्यशैलीमुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात उंचावली. केवळ पोलीस विभागातील अधिकारीच नव्हे, तर सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, पत्रकार, व्यापारी वर्ग, तरुणाई आणि सामान्य नागरिक आज एकमुखाने सांगत आहेत ''जिल्ह्याने एक कडक अधिकारी गमावला, पण राज्याने एक कर्तबगार समादेशक मिळवला.''

नव्या अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात यांच्याकडूनही जनतेला अशाच कार्यक्षमतेची अपेक्षा आहे आणि त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# सुशीलाताई जाधव विद्यानिकेतनमध्ये वृक्षदिंडी व आषाढी एकादशी उत्साहात



**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :**शहरातील लाखाळा परिसरातील सौ. सुशीलाताई जाधव विद्यानिकेतनमध्ये आषाढी एकादशी निमित्त वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल–रुख्मिणीसह वारकऱ्यांची वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका ज्योती भाकरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सरनाईक, वैशाली अवचार, मुक्ताताई काठोळे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते वैराग्यमूर्ती राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे शिल्ड पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त आपापले विचार व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांमधून वैशाली अवचार मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, संस्काराची रुजवणूक ही फक्त मराठी शाळेमधूनच होत असून संस्कार समाजाला योग्य दिशा देण्यासाठी आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर मुख्याध्यापिका ज्योती भाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे संचालन भक्ती मुठाळ हिने केले. शिक्षिका राधा साबळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका ज्योती भाकरे, शिक्षक अशोक ढोके, हिप्पी भिसडे, अनिल गोरे, राधेश्याम गवळी, रघुनाथ करवते, सागर जाधव, हनुमान करवते, विलास बाजड, अवचार, शिक्षिका राधा साबळे जया आरु, मुखमाले, गायत्री देशमुख, पार्वती सुर्वे, कल्याणी धामणे शिक्षकेतर कर्मचारी गजानन कव्हर, शोभा पाचरे, रूपाली काटकर आदींची उपस्थिती होती.

## मुंबईतील मेहबूब स्टुडिओमध्ये श्रीलीला करतेय शूट, पण कोणत्या चित्रपटासाठी हे मात्र गुलदस्त्यात! –

**मुंबई/प्रतिनिधी :** चित्रपटसृष्टीत हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीची जवळीक वाढत चालली असून अनेक दाक्षिणात्य कलाकार मुंबईत शूटसाठी येताना दिसतात. साऊथमध्ये प्रसिद्ध असलेली आणि पुष्पा २मधील किसीक गाण्यामुळं भारतभरात नावारूपास आलेली अभिनेत्री श्रीलीला नुकतीच मुंबईत स्पॉट झाली. ती मेहबूब स्टुडिओमध्ये एका चित्रपटाच्या शूटसाठी आली आहे. आता ती कोणत्या चित्रपटासाठी शूट करत आहे हे मात्र गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. तिचा नवीन लूक आणि आत्मविश्वासपूर्ण उपस्थिती पाहता सर्वांनाच प्रश्न पडला आहे, श्रीलीला एखाद्या मोठ्या हिंदी प्रोजेक्टसाठी तयारी करत आहे का?

# मत्स्य व्यवसाय चांगला नफा देणारा उद्योग

## कृषी विज्ञान मत्स्य सेवा केंद्राचे चंद्रकांत दाते यांची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**






**बारामती/प्रतिनिधी :** मत्स्य व्यवसाय हा चांगला नफा देणारा उद्योग असून कमी जागेत आणि कमी मनुष्यबळ हा व्यवसाय करून चांगला नफा मिळवता येतो. अशी माहिती बारामती कृषी विज्ञान केंद्रातील मत्स्य सेवा केंद्राचे चंद्रकांत दाते यांनी दैनिक आपला विदर्भाला दिली. बारामती कृषी विज्ञान केंद्रातील मत्स्य सेवा केंद्राचे डॉ. चंद्रकांत दाते म्हणाले की, मच्छी पालन करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती आहेत. शेततळ्यात सोडण्यासाठी भारतीय प्रजातीच्या मच्छी जसे जवतेर, चंदेरा,कोंबडा ही शेततळ्यात वाढू शकणारे मत्स्य प्रजाती आहेत. आता चिलापी ही नवीन प्रजाती विकसित झालेली आहे.शेततळ्यामध्ये राहू, कटला, कोंबडा या प्रजाती ७ ते आठ ८ फूट पाणी असलेल्या ठिकाणी चांगल्या वाढतात. तसेच चिलापी ही सुद्धा चांगली वाढ करते. ३०० ते ५०० ग्राम चिलापी माशी होण्यासाठी आठ महिन्याचा कालावधी लागतो. एक किलोचा वजन होण्यासाठी साधारणता एक वर्षाचा कालावधी लागतो. १० गुंठे जाग्यामध्ये हा व्यवसाय उभा करता येतो. त्याचबरोबर मासे व भाजीपाला हा जोडव्यवसाय सुद्धा करता येतो. त्यामुळे पाण्याची बचत होऊ शकते. भाजीपाला करण्यासाठी या ठिकाणी दगडाचा व रेतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे पाणी कमी लागतो आणि हेच भाजीपाल्याचे पाणी शुद्धीकरण होऊन मासोळी पालन करणाऱ्या टँकमध्ये जाते माती व भाजीपाल्यांच्या मुळांमुळे पाणी हे शुद्ध होते. त्यामुळे मासोळ्यांची वाढ चांगली होते. अशी माहिती त्यांनी दिली तरुण वर्ग मत्स्य शेतीकडे वळत आहे.या व्यवसायात पैसा आहे आणि तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षण घेऊन हा व्यवसाय केल्यास निश्चित यामध्ये नफा आहे. इतर ठिकाणी नफ्याची शाश्वती नाही. मात्र येथे शाश्वती आहे. युवक व महिला हा उद्योग सुरू करू शकतात. जवळपास ६० टक्के नफा या उद्योगांमध्ये आहे. बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने प्रशिक्षण देण्यात येत असून हा उद्योग सुरू करण्यापासून त मार्केटिंग पर्यंत सर्व प्रकारची माहिती या प्रशिक्षणामध्ये दिल्या जाते. हा उद्योग करू इच्छितो नाऱ्या महिला तरुण अथवा शेतकरी यांनी प्रशिक्षण घेऊन उद्योग सुरू करावा.त्यामुळे त्यांचा व्यवसाय फेल होणार नाही. तांत्रिक बाबीची माहिती मिळाल्याने अधिकाधिक नफा मिळण्यास त्यांना मदत होईल. यासाठी येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सुविधा असल्याची माहिती ही बारामती कृषी विज्ञान मत्स्य सेवा केंद्राचे चंद्रकांत दाते यांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### नाशिक 'मनपा'तील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातील गैरप्रकार प्रकरणी चौकशी होणार – मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांवर वेतनाबाबत अनेक गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. या संदर्भात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात येईल. संबंधित ठेकेदार आणि महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येणार असून, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

याबाबत सदस्य देवयानी फरांदे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कामगारांच्या खात्यात जमा होणाऱ्या वेतनातील रक्कम दुसऱ्याने काढल्यास, तो प्रकार फौजदारी गुन्हा मानला जाईल आणि दोषींवर कडक फौजदारी कारवाई केली जाईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हित जपण्यासाठी कामगार विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून कामगारांचे वेतन थेट व सुरक्षितपणे त्यांच्या बँक खात्यात जमा होईल, यासाठी उपाययोजना केल्या जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### फनेल झोनमधील रखडलेल्या इमारतींचा लवकरच पुनर्विकास – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** फनेल झोनमध्ये उड्डाण मर्यादा आणि विविध तांत्रिक कारणांमुळे या भागातील अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. मुंबईतील विमानतळाच्या फनेल झोनमध्ये येणाऱ्या आणि अनेक वर्षांपासून रखडलेल्या इमारतींचा पुनर्विकास लवकरच करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

सदस्य अमित साटम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. यावेळी सदस्य वरुण सरदेसाई, मनीषा चौधरी यांनी चर्चेत सहभाग घेतला.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या मालकीची हाय फ्रिक्वेन्सी कम्युनिकेशन यंत्रणा सध्या अंधेरी (पश्चिम) व दहिसर (पूर्व) येथे कार्यरत असून, त्या परिसरात इमारतींच्या उंचीवर निर्बंध असल्यामुळे नागरिकांच्या पुनर्विकास प्रकल्पांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. ही बाब लक्षात घेता, राज्य शासनाने रडार यंत्रणा स्थलांतर करण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. हे निर्बंध हटवण्यासाठी आणि पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी मुख्यमंत्री यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पत्राद्वारे विनंती केली आहे. फनेल झोनमधील इमारतींच्या पुनर्विकासामधील अडथळे दूर करून लवकरच या इमारतींचा पुनर्विकास मार्गी लावण्यात येईल. राज्य शासनाने यासाठी हस्तांतरणीय विकास हक्क तसेच प्रीमियम दरात सवलत देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे.

### जळगाव जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याबाबत बैठक घेणार – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र हे जळगाव जिल्हा पुरतेच मर्यादित आहे. जळगाव जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांची जमीन जळगाव जिल्ह्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यात असल्याने या शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप केले जात नाही. याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यासाठी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकार विभाग आणि नाबार्डच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.या संदर्भात सदस्य किशोर पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती.



सहकार मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा व धुळे या जिल्ह्या लगत असलेल्या गावात शेती असणाऱ्या शेतकरी सभासद जळगाव जिल्ह्यात रहिवाशी आहेत. मात्र त्यांचे जमिनीचे क्षेत्र लगतच्या जिल्ह्यातील गावांमध्ये आहे, त्यांना अल्पमुदत कर्ज दिल्यास त्यातील काही शेतकरी सभासद थकबाकी झाल्यास कलम १०२ ची वसुली प्रकरणी त्या संबंधित तालुका उप/ सहाय्यक निबंधाकडे दाखल करता येत नाही, त्यामुळे कायदेशीर वसुली करता येत नाही. तसेच त्या जिल्ह्यातील पीक विमा कंपनी बदल झाल्यामुळे त्यांचा पंचनामा करण्यास अडचणी निर्माण होतात व त्यांना पीक विमा मिळत नाही. त्यामुळे अशा शेतकरी सभासदांना बँक अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा करू शकत नाही. बँकेचे कार्य जळगाव जिल्ह्या पुरतेच मर्यादित असल्यामुळे बँक जिल्हा बाहेरील शेतकरी सभासदांना पीक कर्ज पुरवठा करू शकत नाही, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# अंधेरीतील कांदळवन तोडीविषयी गंभीर चिंता

## चौकशी समिती गठीत करण्याचे उपसभपती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे



**मुंबई :** अंधेरी परिसरातील तब्बल ३०० एकर कांदळवन व वृक्षतोडीच्या विनाशकारी हस्तक्षेपाची विधानपरिषदेमध्ये उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्यांनी या विषयावर सखोल चर्चा करत स्पष्ट केले की, ही बाब केवळ पर्यावरणाशी संबंधित नसून शहरी नियोजन, कायदा-सुव्यवस्था आणि प्रशासनिक नैतिकतेचा गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे तातडीने संयुक्त बैठक घेणे आणि चौकशी समिती गठीत करण्याचे निर्देश त्यांनी सभागृहात दिले.

या मुद्द्यावर विधानपरिषद सदस्य अनिल परब यांनी लक्षवेधी प्रस्ताव मांडला. त्यांनी अधिवेशनात सांगितले की, अंधेरीतील सुमारे ३०० एकर भूखंडावर अवैधपणे माती भरून समुद्राच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखण्यात आला आहे. सीआरझेड-१ क्षेत्रात भराव टाकून जागा हडप करण्यात आली असून, संबंधितांवर केवळ गुन्हा दाखल झाला आहे, मात्र कोणतीही ठोस कारवाई अद्याप झालेली नाही, हेही त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या, ''अधिवेशन १८ जुलैला संपणार असून पुढील अधिवेशन डिसेंबरमध्ये होणार आहे. तोपर्यंत या विषयाकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यामुळे वन विभाग, पर्यावरण विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित केली जावी.''

सन्माननीय मंत्री महोदयांनी १२ किंवा १३ जुलै रोजी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून १४ तारखेपर्यंत संबंधित बैठक घ्यावी, असेही त्यांनी सुचवले. या विषयावर वन विभाग आणि संबंधित विभाग यांची एकत्र बैठक मुख्यमंत्र्यांनी घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले. जर ही बैठक झालीच नाही, तरीही १८ तारखेच्या आत आपण एक बैठक आयोजित करू, असे त्या म्हणाल्या.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी विशेषतः सुचवले की, या पाहणीत आणि बैठकीत मंत्री महोदयांनी अनिल परब, भाई जगताप, प्रवीण दरेकर व अन्य ज्यांनी हा विषय उपस्थित केला आहे, त्यांना सहभागी करून घ्यावे. त्यांनी स्पष्ट केले की या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली असली तरी, इतक्या तपशीलवार स्वरूपाची मांडणी याआधी कधीही झाली नव्हती.

त्या म्हणाल्या, ''सदर प्रकरणातील गंभीरता लक्षात घेता, सर्व संबंधित विभागांना एकत्र करून वास्तविक परिस्थितीची चौकशी केली जावी. यामुळे या कामाला गती मिळेल.''

### मुंबईतील शासकीय जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत कारवाईसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करणार– उद्योग मंत्री उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील शासकीय जागांवरील अनधिकृत बांधकामबाबत उचित कारवाई करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात येत असल्याची उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. सदस्य योगेश सागर यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य ज्योती गायकवाड, अमीन पटेल, रईस शेख, मंदा म्हात्रे यांनी सहभाग घेतला. उद्योग मंत्री श्री. सामंत म्हणाले, सदस्य योगेश सागर यांनी मुंबईतील शासकीय जागेवरील अनधिकृत बांधकामांची माहिती सभागृहात सादर केली आहे. यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली जात असून या समितीमध्ये मुंबई पोलीस आयुक्त, मुंबई शहर व मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी यांचाही समावेश राहणार आहे. या समितीकडून दर तीन महिन्याला केलेल्या कार्यवाहीचा अहवाल घेतला जाईल. शासकीय जागेवर जाणीवपूर्वक केलेल्या अधिकृत बांधकामावर कारवाई होणे आवश्यक असून यासंदर्भात समिती उचित कार्यवाही करेल.

## जलोत्सव अभियानात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** पावसाळ्यात मिळणारे पाणी हे निसर्गाचे अनमोल देणे असून पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ''जलोत्सव'' या विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानामध्ये जलसंधारणाच्या कामांचे सामूहिक स्वरूपात उत्सव साजरे करण्यात येणार असून नागरिकांचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांनी सांगितले की, पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि जमिनीत रिचार्ज कंपोस्ट करण्यासाठी नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे प्रयत्न करावेत. हे केवळ पर्यावरण रक्षणासाठीच नाही, तर भविष्यातील पाण्याच्या सुरक्षिततेसाठीही अत्यावश्यक आहे. या अभियानांतर्गत, नागरिकांनी आपल्या घरात, परिसरात किंवा शेतीत तयार केलेल्या रेन वॉटर हार्वेस्टिंग संरचनांचे (जसे की जलतरा खड्डा, शाफ्ट, टाकी इ.) २० ते ३० सेकंदांचे व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या व्हिडीओमध्ये व्यक्तीचे नाव, गाव, आणि पावसाचे पाणी साठत किंवा रिचार्ज होत असल्याचे दृश्य स्पष्टपणे दिसणे आवश्यक आहे. व्हिडीओ सहज व स्पष्ट असावा, त्यात कोणतीही एडिटिंग आवश्यक नाही. सेल्फी मोडमध्ये किंवा दुसऱ्याच्या सहाय्याने हा व्हिडीओ शूट करता येईल. व्हिडीओ पोस्ट करताना #caughttherain, #jalkranti, #PMModi हे हॅशटॅग वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच हे व्हिडीओ जिल्हा प्रशासन, जलशक्ती विभाग आणि राज्यस्तरीय पथकांपर्यंत देखील पोहोचवावेत. जलसंधारणाबरोबरच हा जलउत्सव देखील आहे. आपण आपल्या कामाचा अभिमानाने सहभाग घ्यावा व जिल्ह्याला जलसंधारण क्षेत्रात अग्रेसर करावे,असेही जिल्हाधिकारी यांनी आवर्जून सांगितले.

## अकोला वाशीम सहकारी बोर्डाचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब हिंगणकर यांची महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय संचालकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** अकोला वाशीम सहकारी बोर्डाचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब हिंगणकर यांची महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय संचालकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार अकोला वाशीम सहकारी बोर्डाचे संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. दि प्रिमिअर को ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि पुणेच्या(महाराष्ट्र सहकारी मुद्रानालय) संचालक मंडळाच्या सण २०२५ ते २०३० या पंचवार्षिक निवडणुकीत अकोला जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते बोर्डाचे संचालक नानासाहेब हिंगणकर यांची अविरोध निवड झाल्याबद्दल ७ जुलै रोजी अकोला येथे अकोला वाशीम जिल्हा सहकारी बोर्डाच्या झालेल्या संचालक बोर्डाच्या मीटिंगमध्ये हिंगणकर यांचा सत्कार शाल व पुष्पगुच्छ देवून करण्यात आला यावेळी बोर्डाचे अध्यक्ष विवेक हिवरे उपाध्यक्ष दामोदर गोटे वाशीम संचालक प्रकाश पाटील कुटे, अनिल जाधव अमानी, प्रभाकर राऊत भारतीताई गावंडे उमेश ठाकरे मोतीराम ठाकरे सुभाष ठाकरे प्रवीण गोपनारायण मोहन पडोळे नंदकिशोर निलकंठ सहकार विकास अधिकारी कांबे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय नेते शरद पवार व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व अंकुश काकडे यांच्या पुढाकाराने या संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक पार पडली होती. पुणे येथे सन१९७५ ला मुद्रालायचे उद्घाटन भारताचे परराष्ट्रमंत्री स्व. वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते व राज्याचे मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते. असा उज्वल वारसा जोपासत ही संस्था नावारूपास आली आहे. या संस्थेचे संचालक म्हणून माजी मंत्री स्व. नानासाहेब सपकाळ, सहकार महर्षी स्व. अण्णासाहेब कोरपे, महादेवराव भोईभार,संतोष कोरपे यांनी प्रतिनिधी केले आहे. तर रमेश हिंगणकर यांना परत या संस्थेवर संचालक म्हणून निवड करण्यात आल्यामुळे यांचा सत्कार करण्यात आला आहे.

# सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजनेत ३१ जुलैपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या खरीप हंगामापासून लागू करण्यात आलेली आहे. सुधारित पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासनाने जारी केल्या आहेत. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या कृषी कार्यालयास संपर्क करावा, असे आवाहन कृषि उपसंचालक संजीवनी कणखर यांनी केले आहे.

जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

**योजनेचे उद्देश :** नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल.

**योजनेचे वैशिष्टे :** सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत खरीप २०५ व रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षापैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत भात, सोयाबीन, कापूस व गहू या पिकाकरिता खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्राप्त तांत्रिक उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल.



योजने अंतर्गत खरीप व रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील.

पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर सोयाबीनसाठी ११६० रुपये, कपाशी ९०० रुपये, तुर ४७० रुपये, मका ९० रुपये, मुंग ७० रुपये, उडीद ६२.५०रुपये, ज्वारी ८२. ५० रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

# मेहकर तालुक्यातील सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थेत ग्रामपंचायत ही संस्था अत्यंत महत्त्वाची संस्था असून ग्रामीण भागातील राजकारणात सरपंचपदाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत ग्रामपंचायत अथवा सरपंचपदाची निवडणूक अटीतटीची होऊन प्रतिष्ठित होते. ग्रामस्तरावर अत्यंत महत्त्वाचे असलेल्या सरपंचपदाच्या आरक्षण मेहकर येथील तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आले. आरक्षणावरून अनेकांचा हिरमोड झाला आहे. तर सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत.त्यामुळे ग्राम स्तरावरील राजकीय वातावरण आता पुढील काळात चांगलेच तापमान असल्याचे चित्र दिसून येत आहे.

येथील तहसील कार्यालयात तालुक्यातील सरपंच पदाच्या आरक्षण जाहीर झाले असून यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सारंगपूर, सोनाटी, फैजलापूर, लोणी गवळी, वरवड, गजरखेड, देऊळगाव, वर्डडीवैराळ, कळपविहीर, घाटनांद्रा, मोळा येथील सरपंच पद राखीव निघाले आहे. तर, अनुसूचित जाती महिला प्रवर्गाकरिता बाऱ्हई, लव्हाळा, चायगांव, बरटाळा, अंधृड, वर्दडा, सावंगीवीर, लावणा, अरेगाव, सोनार व पांगरखेड येथील पद राखीव निघाले आहे. नागरिकाचा मागास प्रवर्गामध्ये वडगाव माळी, नायगाव दस्तापूर, कल्याणा, उमरा, सावत्रा, कणका बु., विवेकानंद नगर, माळेगाव, जनुना, पिंपळगाव उंडा, बेलगाव, शेंदला, वरुड, खंडाळा येथील सरपंचपद आरक्षित निघाले आहे.तर, नागरिकांचा मागास महिला प्रवर्गासाठी लोणी, घसरण, शिवाजीनगर, दुधा, थारबरदापूर, जवळा, हिवरा खुर्द, चिंचोली बोरे, नायगाव, मोहना खुर्द, अकोला ठाकरे, वडाळी व घुटी येथील सरपंचपद आरक्षित निघाले आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी परडा, कासारखेड, सारशिव येथील सरपंच पद आरक्षित निघाली आहे. तर, अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी मादणी, शहापूर, मारुतीपेठ येथील सरपंच पद आरक्षित निघाले आहे.



### सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षीत ग्रामपंचायत सरपंचपद

तहसील कार्यालयात तालुक्यातील सरपंचपद जाहीर झाले असून यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गामध्ये गोमेधर, मांडवा सुमेत, मोहना बु., नागापूर, नायगाव देशमुख येथील सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव निघाले आहे. तर, सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी गोहोगाव, गणपूर, शेलगाव दे., शेलगाव काकडे व विश्वी येथील सरपंच पद सर्वसाधारण महिला प्रवर्गसाठी आरक्षीत निघाले आहे.तालुक्यातील नऊ ठिकाणी सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी सरपंच पद आरक्षीत निघाल्याने या ठिकाणी होणारी निवडणुकची मोठी चुरशीची होणार असल्याची चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे.तर सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच राजकीय हालचालींना सुद्धा प्रारंभ झाला आहे.

सर्वसाधारण प्रवर्गासाठी अंत्री देशमुख, उटी, नायगाव, पेनटाकळी, परतापूर, भोसा, मोळी, मुंदेफळ, मांडवा फॉरेस्ट, लोणी काळे, सुकळी, हिवरखेड, विठ्ठलवाडी, कळंबेश्वर, घाटबोरी, जानेफळ, बोथा, ब्रह्मपुरी येथील सरपंचपद आरक्षित निघाले आहे. तर, नागरिकाचा मागास महिला प्रवर्गासाठी उकळी, कंबरखेड, दुगबोरी, पिंपरी माळी, पारखेड, बदनापूर, बाभुळखेड, भालेगाव, मिस्किनवाडी, साब्रा, हिवरा साबळे, वागदेव, अंजनी, बोरी, डोणगाव, देऊळगाव वालई, दादुलगव्हाण येथील सरपंचपद आरक्षित निघाले आहे.

## विविध वृत्त...

### सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी; बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. १७ ते २१ जुलै २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ६० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. १७ जुलैपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा ११ व १२ जुलै रोजी वाशिममध्ये

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटी नवी दिल्ली यांचे द्वारा आयोजित स्पर्धा दि. ११ व १२ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या संघांना खेळाडुंना १५ वर्ष मुले व १७ वर्ष मुले, मुली अशा दोन वयोगटात स्पर्धा घेण्यात येणार आहे. १५ वर्षा खालील मुलांकरीता वय दि. १ जानेवारी २०११ किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच १७ वर्ष वयोगटात मुले व मुली करीता दि. १ जानेवारी २००९ किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. स्पर्धा आयोजन दि. ११ जुलै २०२५ रोजी वयोगट १७ वर्ष मुले व दि.१२ जुलै २०२५ रोजी १५ वर्ष मुले व १७ वर्ष मुली यांच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या संघानी आपला प्रवेश अर्ज दि. १० जुलै २०२५ रोजी ऑनलाईन व्दारे https://dsowashim.in या संकेत स्थळावर सादर करावयाचा आहे. या स्पर्धेत विजयी संघास विभागस्तरीय स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. सहभागी होणाऱ्या खेळाडुंकडे जन्म दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट इत्यादी कागदपत्रे असणे आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या अधिक माहिती करीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील मारोती सोनकांबळे, क्रीडा अधिकारी (मो. ९८८१०७१७७०) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तरी सदर स्पर्धेमध्ये जिल्हयातील जास्तीत जास्त संघाने सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी केले आहे.

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सामावून घेतलेल्या वस्तीशाळा शिक्षकांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** वस्तीशाळा शिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आल्यानंतर शासन निर्णयानुसार या शिक्षकांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (डीसीपीएस) लागू झाली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

यासंदर्भात सदस्य अभिमन्यू पवार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य शेखर निकम, नारायण कुचे यांनी सहभाग घेतला.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले, केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सुरू केल्यानंतर त्यामधील शिक्षण हमी योजनेमध्ये वस्तीशाळा योजना समाविष्ट करण्यात आली. राज्य शासनाने वस्तीशाळा योजनेंबाबत नेमलेल्या अभ्यासगटाने वस्तीशाळांचे प्राथमिक शाळात रूपांतर करण्याच्या आणि दोन वर्षापेक्षा अधिक सेवा करणाऱ्या वस्तीशाळा स्वयंसेवकांना जिल्हा परिषद आस्थापनेवर सामावून घेण्याची शिफारस केली होती. त्यानुसार वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आले.

### गणेश महाराज हुंबाड यांना कीर्तनकार गोलमेज परिषदेचे निमंत्रण

दैनिक आपला विदर्भ



**वाशीम/प्रतिनिधी :** श्री क्षेत्र आळंदी येथे जुलै महिन्यात आयोजित दोन दिवसीय महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदेसाठी वाशिम जिल्ह्यातील महागाव येथील भागवताचार्य कीर्तनकार गणेश महाराज हुंबाड यांना निमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील ५०निवडक कीर्तनकारांना निमंत्रित करण्यात आले. असून त्यात गणेश महाराज हुंबाड यांचा सहभाग असणे ही वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि स्कूल ऑफ एज्युकेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ आणि २० जुलै रोजी क्षेत्र आळंदी येथे महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली. असून वारकरी संप्रदायाची २१ व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप आणि वाटचाल हा या परिषदेतील चर्चासत्राचा विषय आहे एमआयटी शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ.राहुल वि.कराड महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे मुंबई अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे देहूकर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर आणि राष्ट्रीय सरपंच परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांच्या स्वाक्षरीचे दिनांक २५ जून रोजी निमंत्रण पत्र हुंबाड महाराजांना प्राप्त झाले आहे.आदर्श मानवी संस्कृतीच्या निर्मितीचे लोककल्याणकारी कार्य करणाऱ्या आणि विविध जलवंत सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी मूलभूत मार्गदर्शन करणाऱ्या वारकरी सांप्रदायाला आधुनिक समजल्या जाणाऱ्या २१ व्या शतकात कुठल्या प्रमुख ज्वलंत लोकप्रशानाच्या निराकरणासाठी प्रबोधन कार्य करावे. लागणार आहे हे लक्षात घेऊन त्यानुसार प्रबोधनकार यांचे स्वरूप व दिशा कशी असेल ते कार्य यशस्वी करण्यासाठी वारकरी संप्रदायाला कुठल्या समस्या व आव्हानांना सामोरे जावे लागेल विविध स्तरावर वारकरी संप्रदायाला कुठले ठोस सहकार्य अपेक्षित आहे. याविषयी या परिषदेत विचार मंथन केले जाणार आहे.

### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही - उद्योग मंत्री उदय

**मुंबई/प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास आराखड्यामध्ये कोणत्याही नागरिकावर अन्याय होणार नाही, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. सदस्य शंकर जगताप यांनी या संदर्भातला लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य महेश लांडगे यांनीही सहभाग घेतला. उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले, नगर नियोजनामधील आरक्षण प्रक्रियेसाठी एमआरटीपी कायद्यानुसार कार्यवाही केली जाते. त्यानंतर यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारी व निवेदनांचा गांभीर्याने विचार केला जातो. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास आराखड्यामधील प्रस्तावित आरक्षणांबाबत कोणत्याही व्यक्तीला शंका असल्यास, त्यांनी लेखी तक्रार अथवा निवेदन सादर केल्यास त्याची चौकशी केली जाईल. तसेच धार्मिक स्थळांवर आरक्षण आल्यास त्याचीही तपासणी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

### रामा इंटरनॅशनल स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळा आणि वृक्ष दिंडी उत्साहात साजरी

#### शाळेच्या अंगणात विठ्ठलनामाचा गजर, वृक्षदिंडीतून पर्यावरणाचा जागर

दैनिक आपला विदर्भ



**वाशीम/प्रतिनिधी :** रामा इंटरनॅशनल स्कूल, वाशीम येथे आषाढी एकादशीच्या शुभदिनी भव्य पालखी सोहळा, वृक्ष दिंडी आणि पारंपरिक पावली रिंगण सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सकाळी विठ्ठलनामाच्या जयघोषात टाळ-मृदंगाच्या गजरात पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाईच्या पालखीची मिरवणूक काढली. ''माऊली माऊली'', ''ज्ञानोबा-तुकाराम'' अशा भक्तिपूर्ण घोषणा करत परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

या सोहळ्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'वृक्ष दिंडी', ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या हातात रोपं घेऊन मिरवणूक काढत पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. ''एक पाऊल भक्तीचे, एक पाऊल पर्यावरण रक्षणाचे'' या बोधवाक्याने कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण झाला.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले पावली रिंगण सोहळा, जो पारंपरिक वारकरी पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी आनंदाने व उत्साहाने या रिंगणात भाग घेत वारकरी संस्कृतीचा अनुभव घेतला.या भावमय सोहळ्याला व्यंकटेश सेवा समितीचे अध्यक्ष व माजी आमदार मा. विजयराव जाधव यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी अशा कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, भक्तिभाव आणि सामाजिक भान निर्माण होत असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रामा इंटरनॅशनल स्कूलच्या या उपक्रमाचे सर्वत्र अभिनंदन होत असून, विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, संस्कार व पर्यावरणप्रेम रुजविणारा हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला.

### स्वयंरोजगाराभिमुख अभ्यासक्रम निवडणे योग्य उपप्राचार्य सुनील उज्जैनकर : येणारा काळ हा व्यवसाय शिक्षणाचा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** येणारा काळ हा व्यवसाय शिक्षणाचा आहे. काळाची पावले ओळखून वाशीम जिल्ह्यातील तरूणांनी व्यवसाय शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा विभाग प्रमुख सुनील उज्जैनकर यांनी केले.


सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या सत्रारंभ सभेत शिक्षक आणि विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. कौशल्य विकास, उद्योजकता याला केंद्रशासन महत्त्व देत असून, नवीन शैक्षणिक धोरणातही याला महत्त्वाचे स्थान आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्त्व नव्या पिढीला पटवून देण्याची शिक्षक म्हणून आपलीच जबाबदारी आहे, असे उपप्राचार्य उज्जैनकर म्हणाले. सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयात तंत्र गटात विविध विभागात प्रवेशाची सोय असून ऑटोमोबाइल टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी, इलेक्टॉनिक्स टेक्नॉलॉजी, असे विविध पर्याय उपलब्ध आहेत. कमी कालावधीमध्ये, कमी खर्चात स्वतः च्या पायावर उभे करणाऱ्या शिक्षणाची आज जास्त आवश्यकता असून, स्वयंरोजगाराभिमुख अभ्यासक्रम निवडणे अधिक योग्य व फायदेशीर आहे, असे विभागप्रमुख उपप्राचार्य उज्जैनकर यांनी सांगितले. व्यवसाय अभ्यासक्रमासाठी दहावी उत्तीर्ण / ए. टी. के. टी. प्रवेश पात्रता असून विशेष म्हणजे ऑफलाइन पद्धतीने प्रवेश होतात, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी विद्यार्थी व व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षक उपस्थित होते.

### सामाजिक योगदानाबद्दल सदाशिव पाटील यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** तालुक्यातील भट उमरा येथील रहिवाशी सदाशिव रामजी काळे पाटील यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबद्दल ग्रामस्थ तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या आवारात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकराव महाले हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर काळे हे तर प्रमुख उपस्थितीमध्ये सरपंच व अन्य मान्यवर मंडळी उपस्थित होती. सदाशिवराव काळे यांनी सामाजिक वसा जोपासत असताना शैक्षणिक योगदान देखील त्यांनी दिले आहे. यापूर्वी त्यांनी शाळेला एक एलईडी संच दिला असून दरवर्षी ते शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करत असतात. गावात प्रवेश करताना स्वागत कमान त्यांच्या कुटुंबीयांनी उभारली असून अनेक



गरजूंना त्यांनी मदत केली आहे. त्यांच्या या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची जाणीव ठेवून त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना अशोकराव महाले यांनी सदाशिव पाटील यांच्यासारखे दाते प्रत्येक शाळेला व गावाला लाभावेत असे मत व्यक्त करून लोकसहभागाच्या माध्यमातूनच शाळा विकास शक्य असल्याचे प्रतिपादन केले. नागरिकांनी आपल्या व्यसनावर खर्च होणारी रक्कम स्वतः व्यसनमुक्त होऊन ती रक्कम शाळेला दिल्यास फार मोठा लोकसहभाग तयार होईल असे प्रतिपादन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डिगांबर साबळे, शिक्षण तज्ञ केशवराज काळे, शाळेतील शिक्षिका वंदना कांबळे, शिल्पा धुळे व श्रीमती सरनाईक यांचे सह गावकरी उपस्थित होते.